सह्याद्री वाहिनीवरील कृषिसंवाद : एक विश्लेषणात्मक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या आंतरविद्याशास्त्रीय अभ्यास विद्या शाखांतर्गत पीएच्.डी. (जनसंवाद व वृत्तपत्रविद्या) पदवीसाठी सादर करावयाचा शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

संशोधक

खंडागळे सचिन नारायणराव

मार्गदर्शक

डॉ.राजेंद्र नारायणराव गोणारकर

सहयोगी प्राध्यापक,

माध्यमशास्त्र संकुल,

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

ऑगस्ट २०२१

सह्याद्री वाहिनीवरील कृषिसंवाद : एक विश्लेषणात्मक अभ्यास

१.२ प्रस्तावना :-

सह्याद्री वाहिनी ही दूरदर्शनची महाराष्ट्रात प्रसारित होणारी उपग्रह व प्रादेशिक वाहिनी आहे. तसेच ती महाराष्ट्रातील दूरदर्शनची सर्वात जुनी वाहिनी आहे. मराठी बातम्या, मालिका, कला, मनोरंजन आणि कृषी विषयक कार्यक्रमाचा मोठा ग्रामीण भागातला प्रेक्षक वर्ग आहे. ही वाहिनी स्वत:चे कार्यक्रम स्वत:च निर्माण करते. सह्याद्री वाहिनीची सुरुवात इ.स.१९९४ साली झाली. प्रसार भारती या वाहिनीचे मालक आहेत. तर 'सत्यम् शिवम सुंदरम्' हे ब्रीद वाक्य घेऊन भारत, चीन आखाती देश इत्यादी देशात तिचे प्रसारण होताना दिसते. या वाहिनीचे मुख्यालय मुंबई येथे आहे. सह्याद्री वाहिनी एक असा मंच आहे जिथे शेतकरी त्यांचे शेतीशी निगडीत प्रश्न तसेच समस्या आणि त्यावरील उपाय याबद्दल चर्चा करु शकतात. याचाच अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधात करण्यात येणार आहे.

सह्याद्री वाहिनीवर विविध कृषी विषयक संवादाचे कार्यक्रम होतात. या कृषी संवादाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कृषी तज्ज्ञामार्फत शेतीशी निगडीत मार्गदर्शन कसे केले जाते? याचा अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रामध्ये शेती हा राष्ट्रीय जीवनाचा मुख्य आधार आहे. त्यामुळे कृषी विषयक संवादाचा अभ्यास करताना सह्याद्री वाहिनीची त्या क्षेत्रातील कामगिरी विचारात घ्यायची आहे.

भारतीय शेती ही शतकानुशतके हवामानावर व मान्सुनच्या लहरीपणावर अवलंबून आहे. प्रत्येक वर्षी अतिवृष्टी, चक्रीवादळ, गारांचा पाऊस, दुष्काळ, अति तापमान,

कडाक्याची थंडी यांसारख्या घटकांचा अन्नधान्याच्या वाढीवर विपरीत परिणाम दिसून येतो. आपल्याकडे उपलब्ध असलेली जमीन, पाण्याचा साठा याचा सक्षम उपयोग व प्रतिकुल हवामानाचा परिणाम कमी करुन अनुकूल हवामानाचा फायदा करुन घेण्यासाठी कृषी संदर्भात विशेष सल्ला मोबाईलच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सह्याद्री वाहिनी देते. याचा अभ्यास देखील या संशोधनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

ग्रामीण पातळीवर कृषीविषयक गरजा पुरवण्यासाठी मोबाईलवर कृषीविषयक सल्ला, एसएमएसद्वारे पावसाचे अंदाज दिले जातात, पेरणी कधी आणि कशी करायची याचा सल्ला या कार्यक्रमाच्या माध्यमातून कशाप्रकारे दिल्या जातो याचा शोध घेण्यात येणार आहे, हवामान केंद्राच्या माध्यमातून भारत सरकारच्या हवामान खात्याकडे अंदाज पाठवून कृषी कार्यक्रमातून माहिती व कृषी सल्ला दिल्या जातो. 'आमची माती, आमची माणसं' या कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतीविषयक यश-अपयश सांगितले जाते. शेतकऱ्यांशी कृषीविषयक संवाद साधला जातो. 'कृषी समृद्धीची गुरुकिल्ली', मोबाईलवरुन कृषी सल्ला देऊन पेरु, आंबा इत्यादी फळपिकांच्या लागवडीसंदर्भात सह्याद्री वाहिनीवरुन शेतकऱ्यांशी संवाद साधला जातो. पाणी व्यवस्थापन, सुधारीत औजारे, नवीन बी-बियाणे, औषधे यांची माहिती शेतकऱ्यांना दिली जाते. याचा अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधात करण्यात येणार आहे.

भारतीय समाजामध्ये अज्ञान व अंधश्रद्धेचे प्राबल्य आहे. प्रा.घोटाळे म्हणतात, 'अज्ञानामुळे अंधश्रद्धा व जुनाट कल्पना तशाच कायम आहेत. कृषी संशोधनाच्या विस्तारात अज्ञान दूर करणे हे खरे आव्हान आहे.' कृषी विकासामध्ये वृत्तपत्राप्रमाणेच इलेक्ट्रॉनिक माध्यम प्रभावी भूमिका पार पाडत आहेत. त्यांच्या या भूमिकेचे यथार्थ मूल्यमापन करण्याची गरज आहे. विकसनशील राष्ट्राला तसेच विकसित देशाला या संशोधनाची अधिक गरज आहे. या कृषी विस्तारासाठी असे संशोधन पूरक ठरु शकते.

भावी काळात कृषी विषयक संवादाचे महत्त्व लक्षात घेऊन या शोधप्रबंधामध्ये संशोधनाच्या माध्यामातून प्रकाश टाकण्यात येणार आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधाचा विषय हा शेतकरी बांधवांच्या जीवनप्रवाहाशी निगडीत आहे व या अभ्यासाची उपयुक्तता, काबाडकष्ट करणाऱ्या हजारो शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे कृषी जनसंवादातील सह्याद्री वाहिनीचा हा वापर अनेक दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे. शेतीसाठी उपयुक्त संशोधनाचा विस्तार, हंगामातील प्रश्न व त्यावर उपाय, रोगराई, पिके आणि त्याच्यावर केली जाणारी औषधांची फवारणी, सिंचनसुविधा, तसेच पिकांचे नियोजन, विपणन, बाजारपेठेत त्यांना लाभणारी मागणी इत्यादी घटकांचा विचार करुन सह्याद्री वाहिनीवरील कृषी विषयक संवादाचे आशय विश्लेषण करावयाचे आहे. तसेच या वाहिनीवरील कार्यक्रमाला शेतकरी कसा प्रतिसाद देतात हे पाहण्यासाठी सह्याद्री वाहिनीवरील कृषी विषयक संवादाचे सर्वेक्षण करावयाचे आहे.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. मराठवाड्यातील बहुसंख्य लोक हे शेतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे या जनतेचे डोळे पावसाकडे लागलेले असतात. यंदा पुरेसा पाऊस होणे शक्य आहे? मान्सुनचे आगमन केव्हा होणार? याचा अंदाज वर्तवणाऱ्या बातम्या सह्याद्री वाहिनीवरुन सातत्याने प्रसिद्ध केल्या जातात. याच शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन व मान्सुन हा भारताकडे कसा सरकत आहे? यंदा मान्सुनचे प्रमाण कसे आहे? या संबंधीच्या बातम्या सह्याद्री वाहिनीवरुन नियमित प्रसारित केल्या जातात. पावसाला सुरुवात झाल्यानंतर ठिकठिकाणी होणाऱ्या शेतीविषयक वृत्ताला सह्याद्री वाहिनीवरुन सातत्याने प्रसिद्धी दिली जाते. त्यामुळे शतकऱ्यांना मार्गदर्शन होते व जनतेला पर्जन्यमानाची कल्पना येते. शेतकऱ्यांच्या सुखा-दु:खाशी सह्याद्री वाहिनी समरस आहे याची प्रचिती येते. एखाद्या शेतकऱ्याने तुरीचे, भूईमुगाचे व डाळींबाचे अमाप पीक घेऊन विक्रम केला तर त्याचे वृत्त शेतकऱ्याच्या मुलाखतीसह सह्याद्री वाहिनीने देऊन अशा

शेतकऱ्यांना प्रोत्साहित केले आहे. पर्यावरण मानवीय जीवनाशी अतिशय निगडीत आहे हा प्रश्न गंभीर बनला आहे. अशा बिघडलेल्या पर्यावरणाची जाणीव करून देणारे वृत्तही विशेष कृषी संवाद या कार्यक्रमातून प्रसिध्द केले जाते. कृषीवर आधारित असलेल्या उद्योगाशी संबंधित वृत्तेही सह्याद्री वाहिनीवरुन सातत्याने प्रसिध्द होताना दिसतात. साखर उद्योग हा कृषीवर आधारित सर्वात महत्त्वाचा व मोठा उद्योग आहे. साखर कारखान्यांमुळे त्या-त्या भागातील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढते, अनेकांना काम मिळते व त्या भागात समृध्दी येते. ऊस अधिक झाल्यास साखर कारखाने ऊस उचलण्याची सोय करीत नसल्यामुळे त्या शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींबाबतचे वृत्तही सह्याद्री वाहिनीवरुन वेळोवेळी झळकताना दिसते. साखर कारखान्याचा बॉयलर प्रज्वलित करण्याचा समारंभ असो की, साखर कारखान्यात होणाऱ्या उत्पदनासंबंधी माहिती असो वा साखर कारखान्याकडून होणारी ऊस उत्पादकाची पिळवणूक असो, त्यासंबंधीचे वृत्तही सह्याद्री वाहिनीवरुन दिले जाते.

अशाप्रकारे सह्याद्री वाहिनीवरील विविध कृषी विषयक कार्यक्रम शेतकऱ्यांच्या भल्याचे व कृषीला नवा आयाम देणारे आहेत. 'आमची माती, आमची माणसं', 'कृषी समृध्दीची गुरुकिल्ली', 'मोबाईलवरुन कृषी संदेश' इत्यादी कार्यक्रमाच्या माध्यमातून सह्याद्री वाहिनी कृषी विषयक संवाद साधताना दिसते. या संवादाचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात करण्यात येणार आहे तसेच या विषयाचे विश्लेषण शास्त्रीय दृष्टिकोनातून करण्यावर भर दिल्या जाणार आहे त्यामुळे हे संशोधन नवी दृष्टी देण्याचे काम करेल अशी आशा आहे.

१.२ अभ्यासाची गरज (Need of Research) :-

प्रस्तुत विषयाचे संशोधन करत असताना, समाजातील पारंपरिक शेतीमुळे होणारे नुकसान आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा होणारा फायदा याचे शास्त्रीय पद्धतीने संशोधन

करण्यात येणर आहे. आजही ग्रामीण भागात पारंपरिक शेतीवरच भर दिल्या जातो. त्यामुळे शेतीचे उत्पन्न घटते, सह्याद्री वाहिनीवरील कृषी संवाद किती लोकांशी होतो? किती लोक अनुकरण करतात? किती लोकांना या कार्यक्रमाचा फायदा झाला याचा अभ्यास प्रस्तुत शोधप्रबंधात करण्यात येणार आहे.

कृषी विज्ञान, तंत्रज्ञान, शेती व शेतकऱ्यांच्या संदर्भातील मानवी आस्था, कृषी साहित्य, करमणूक, औषधे, खते, बी-बियाणे, हवामान, पर्जन्यमान, पाऊसपाणी, पशु-पक्षी संवर्धन, दुग्ध प्रकल्प, जलसंवर्धन, जलसिंचन इत्यादी संदर्भाने होणारा कृषी विषयक संवाद अभ्यासणे गरजेचे आहे. जेणेकरुन यातून जनतेला फायदा होईल म्हणून या शोधप्रबंधाचा विषय "सह्याद्री वाहिनीवरील कृषी संवाद : एक विश्लेषणात्मक अभ्यास" निवडला आहे. यातून शेतकऱ्यांना फायदा कसा होतो याचा विचार करण्यात येणार आहे.

१.३ संशोधनाची समस्या (Research Problem) :-

भारत हा कृषीप्रधान देश आहे. परंतु आजही ग्रामीण भागातील जनता अज्ञानी आहे. ती परंपरागत आणि पारंपरिक पद्धतीनेच शेती करताना दिसते. शहरीकरणात वाढ झाल्यामुळे शेतीकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. शेतीचे आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण करताना सह्याद्री वाहिनीच्या माध्यमातून पारंपरिक व आधुनिक प्रणालीमध्ये कसा समन्वय साधावयाचा हा खरा प्रश्न आहे. शेती क्षेत्रात क्रांतीकारक बदल घडवून आणायचे असतील तर अशा कृषी संवाद कार्यक्रमाची आवश्यकता आहे. सामाजिक, आर्थिक विकास साधावयाचा असेल तर शेतकऱ्यांचे प्रश्न व त्यांचे अज्ञान कृषी विषयक संवादाच्या माध्यमातून दूर करता येते. त्यामुळे सामान्य शेतकऱ्यांपर्यंत कृषी संशोधन पोचवताना सह्याद्री वाहिनी कोणती भूमिका पार पाडत आहे व त्यांना भावी काळात कोणते बदल करणे अपेक्षित आहे ते या संशोधनाच्या रुपाने अभ्यासावयाचे आहेत.

कोणत्याही प्रसारित कार्यक्रमाचे यश हे त्याच्या मूल्यमापनावर अवलंबून असते. मूल्यमापनाचा अंतिम हेतू हा प्रसारणाची गुणवत्ता वाढवणे हा असतो. या प्रबंधाच्या माध्यमातून कृषी विषयक संवादात सह्याद्री वाहिनीच्या कामगिरीचा अभ्यास व त्यामध्ये काय सुधारणा करता येईल याचा विचार करावयाचा आहे. सतत बदलणारे हवामान, ओला-कोरडा दुष्काळ, बदलणारे समाजजीवन यातून शेतीकडे होणारे दुर्लक्ष, त्यातून होणाऱ्या शेतकरी आत्महत्या, निराशावादी जीवन या सर्वांना निराशेतून बाहेर काढण्यासाठी शेतकऱ्यांशी संवाद होणे गरजेचे आहे. त्यांचे प्रश्न, त्यांच्या अपेक्षा इत्यादी संकल्पना अभ्यासण्यासाठी "सह्याद्री वाहिनीवरील कृषी संवाद : एक विश्लेषणात्मक अभ्यास" हा विषय निवडला आहे.

१.४ संशोधनाची उद्दिष्ट्ये (Research Objectives) :-

कोणतेही सामाजिक संशोधन उद्दिष्टांवर अवलंबून असते. सुनिश्चित उद्दिष्टांमुळे त्या संशोधन कार्याला काळजीपूर्वक अभ्यासता येते. प्रा.पु.ल.भांडारकर यांच्या मते, "संशोधनासाठी कोणता विषय निवडला जाईल, हे बऱ्याचअंशी संशोधकाच्या मूल्याभिमुखतेवर अवलंबून असते. कुठलेही संशोधन करताना त्या संशोधनाची उद्दिष्ट्ये सुस्पष्ट असणे हे अत्यंत गरजेचे आहे." संशोधन क्षेत्रातील अभ्यासक डॉ.बी.एम.कऱ्हाडे म्हणतात, "प्रत्येक संशोधनाची सुरुवात एखादा प्रश्न सोडविण्यासाठी किंवा एखाद्या समस्येचे निराकरण करण्याच्या उद्देशाने होत असते. का? कसे? कुठे? कुणी? कशास? यापैकी एका प्रश्नाने संशोधनाची सुरुवात केली जाते वा अन्य प्रश्न त्याचे उपप्रश्न बनून विषयवस्तुचे समग्र, सखोल व सुक्ष्म अध्ययन केले जाते."

थोडक्यात, संशोधनाचा उद्देश नवीन ज्ञानाचा शोध, त्याचे संपादन व जुन्या ज्ञानाचे परीक्षण करणे हे आहे. संशोधन ही एक बौद्धिक प्रक्रिया आहे. प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहेत.

१. कृषी संदर्भातील नवनवीन माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे व शासनाच्या विविध सरकारी योजनांचा शोध घेणे.

२. सह्याद्री वाहिनीवरील कृषी विषयक संवाद कार्यक्रमातून सामान्य जनतेच्या ज्ञानात माहिती तंत्रज्ञानाची भर पडते आहे का? याचा शोध घेणे.

३. कृषी विषयक संवाद कार्यक्रमातील अन्य आशय विश्लेषणाचा अभ्यास करणे.

४. सह्याद्री वाहिनीवरील कृषी विषयक कार्यक्रमांचा शेतकऱ्यांना काय फायदा झाला याचा अभ्यास करणे.

५. सह्याद्री वाहिनी आधुनिक शेतीसंदर्भात काय संवाद साधते याचा अभ्यास करणे.

६. सह्याद्री वाहिनीवरील कृषी विषयक कार्यक्रमातून साधलेल्या संवादाची यशस्वीता अभ्यासणे.

७. शेतकऱ्यांच्या समस्यांचा शोध घेणे.

१.५ संशोधनाची गृहितके (Hypothesis of Research) :-

१) सह्याद्री वाहिनीमुळे शेतकऱ्यांना माहितीचा स्रोत मिळत आहे.

२) सह्याद्री वाहिनीवरील कार्यक्रमामुळे शेती क्षेत्राचा विकास होत आहे.

३) सह्याद्री वाहिनीवरील कृषी विषयक कार्यक्रमांचा शेतकऱ्यांवर सकारात्मक परिणाम होतो.

४) सह्याद्री वाहिनीवरील कार्यक्रमातून साधलेला कृषी संवाद प्रभावी ठरत आहे.

१.६ संशोधन पद्धती (Research Methodology):-

प्रस्तुत शोधप्रबंधाचा विषय "सह्याद्री वाहिनीवरील कृषी संवाद : एक विश्लेषणात्मक अभ्यास" हा अभ्यास विषय असून, शेतीसंदर्भातील प्रश्नांची उकल करण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळवण्यासाठी हे संशोधन शास्त्रीय प्रक्रिया असून यातून सामाजिक प्रश्नांना दिशा मिळत असते. सह्याद्री वाहिनीवरील कृषी विषयक संवादाचा शास्त्रीयदृष्ट्या प्रस्तुत शोधप्रबंधात अभ्यास केला आहे. प्रस्तुत शोधप्रबंध अभ्यासासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतींचा अवलंब करण्यात येणार आहे. सदरील संशोधन हे प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांवर आधारित आहे. प्रस्तुत शोधप्रबंधात सदरील विषयासंदर्भात उपलब्ध असलेले संदर्भग्रंथ, विविध कमिट्याचे अहवाल, मासिके, साप्ताहिके, इंटरनेटवरील वेगवेगळ्या वेबसाईटस् इत्यादी माध्यमातून प्राप्त विविध अभ्यासपूर्ण लेख इत्यादी लिखित साहित्यांचा वापर प्रस्तुत शोधप्रबंधाच्या लिखाणासाठी करण्यात येणार आहे.

१.७ आशय विश्लेषण :-

मुद्रित किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातील सामुग्रीचे वर्गीकरण करण्यासाठी वापल्या जाणाऱ्या पद्धतीस आशय विश्लेषण असे म्हटले जाते. ही पद्धती अलीकडे प्रसार माध्यमांच्या समाजशास्त्रीय अभ्यासामध्ये प्रामुख्याने वापरली जाते. बॅरलसन यांनी या संदर्भात केलेले विवेचन अर्थपूर्ण आहे. त्यांच्या मते, "संज्ञापनातील व्यक्त किंवा प्रकट आशयाचा वस्तुनिष्ठ, व्यवस्थित व संस्थात्मक दृष्टीने वर्णन करण्याचे आशय विश्लेषण हे एक तंत्र आहे. या तंत्राचा मुद्रित व इलेक्ट्रॉनिक या दोनही प्रकारच्या माध्यमात उपयोग केला जात आहे." हॉर्नेल हार्ट यांनी १९३० मध्ये अमेरिकन वृत्तपत्रामध्ये परराष्ट्रीय बातम्यांना किती स्थान दिले गेले याचा अभ्यास केला. इ.स.१९३९ साली प्रा.हॅरॉल्ड

लासवेल यांनी या तंत्राचा अधिक चांगल्या प्रकारे विकास केला. त्यांनी महायुद्ध काळातील बातम्यांचा या तंत्रामध्ये अभ्यास केला. सामाजिक संशोधनातील एक तंत्र या नात्याने या पद्धतीचे स्थान अधिक पक्के झाले आहे. या तंत्राचा वापर करुन लासवेल यांनी जर्मनीच्या डावपेचांचे पितळ उघडे केले. हे तंत्र प्रामुख्याने तीन कारणातील वापरले जाते.

१) आशय लक्षणाचा निवेदनाचा उद्देश लक्षात घेणे.

२) आशयातील कारणांची पडताळणी करणे.

३) संज्ञापनातून होणाऱ्या वर्तनप्रक्रिया व अभिवृत्ती बदलाचा अभ्यास करणे.

याबाबत हे तंत्र वापरले जाते. ही पद्धती अधिक प्रमाणात संख्यात्मक आकलनावर भर देणारी आहे. सामाजिक संशोधनामध्ये संख्यात्मक व गुणात्मक या दोन्ही तंत्रांना तेवढेच महत्त्व आहे. नमूना निवड, कालावधीची निश्चिती, मापन पद्धती आणि विश्लेषण तंत्र ह्या पायऱ्या महत्त्वाच्या ठरतात. प्रसारमाध्यमातील आशय का व कसा महत्त्वाचा ठरतो याबाबत मेज जॉन म्हणतात, "अनुभवाचा पाया जास्त विस्तृत करीत असल्यामुळे माध्यमातील आशय हा निरीक्षणात व सामाजिक प्रक्रियेत सहभागी होण्यास सहाय्यभूत ठरतो." बॅरलसन यांनी प्रयत्नपूर्वक विकसित केलेली ही प्रणाली खरोखरच उपयुक्त ठरली आहे. मुद्रित अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातील छापलेला अथवा प्रसारित केला जाणारा आशय हा किती प्रमाणामध्ये सादर केला जातो ते जागा किंवा वेळ मोजून ठरविता येते व त्यामुळे अशा माध्यमातील आशयाचे प्रमाण हे शास्त्रीय पद्धतीचा विकास व वापर करुन ठरविता येते. याचा उपयोग येथे केला आहे. अशा प्रणालीचे उपयोजन केल्यामुळे विविध चित्रवाहिन्यांतील कृषी कार्यक्रमाचे आशय विश्लेषण व मूल्यमापन करणे शक्य होणार आहे, त्यासाठी योजिलेली ही प्रणाली उपयुक्त ठरणार आहे.

१.८ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-

सामाजिक संशोधन हे विषयाच्या मर्यादांवर भर देणारे असते. संख्यात्मक आकलनालाही मर्यादा असतात. या संशोधन प्रकल्पाला पुढील मर्यादांचे भान ठेवणे भाग आहे.

१. हा अभ्यास नांदेड जिल्ह्यातील कृषी विषयक कृषी संवादापुरता मर्यादित आहे.

२. सह्याद्री वाहिनीवरील गेल्या पाच वर्षातील कृषी संवादाचा आढावा.

३. दूरदर्शन माध्यमातील अन्य आशयांपेक्षा येथे शेतीमधील आशयावर अधिक भर दिल्या जाणार आहे.

या सर्व मर्यादांचे स्वरूप लक्षात घेऊन हा अभ्यास करण्याचे योजिले आहे. तसेच या सर्व मर्यादांचे भान राखून या अभ्यासामध्ये शास्त्रीय संशोधनाचा प्रपंच करावयाचा आहे. शेतकऱ्यांना विचारलेले प्रश्न हे सोपे व सुलभ असावेत त्यामुळे प्रश्नांची उकल प्रभावीपणे व्हावी, शेतकऱ्यांकडून प्रश्नांना समर्पक अशी उत्तरे मिळावीत अशी दृष्टी समोर ठेवून प्रश्नावलीचा विकास केला आहे. स्थळ, काळ, परिस्थितीच्या मर्यादांचे भान राखून हे संशोधन योजिले आहे.

१.९ संशोधन साहित्याचा आढावा (Review of literature):-

सदरील शोधप्रबंध पूर्ण करण्यासाठी सह्याद्री वाहिनीवरील कृषी विषयक संवाद या कार्यक्रमाचा अभ्यास केल्या जाणार आहे. तसेच प्रकाशित, अप्रकाशित पीएच्.डी.प्रबंध, मासिके, साप्ताहिके, सह्याद्री वाहिनीचे जुने अंक, विशेष अंक, संदर्भग्रंथ इत्यादींचा येथे अभ्यास केल्या जाणार आहे.

१.१० प्रकरणांची आखणी :-

"सह्याद्री वाहिनीवरील कृषिसंवाद : एक विश्लेषणात्मक अभ्यास" या शीर्षकानुषंगाने केलेले लिखाण अधिक सूत्रबद्ध होण्यासाठी लेखन करताना प्रस्तूत शोधप्रबंधाची विभागणी पुढील प्रकरणांद्वारे केली आहे.

प्रकरण पहिले : संकल्पना

प्रस्तुत प्रकरणात अभ्यास विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट करण्यात येणार असून, त्यांनतर अभ्यासाची निकड व आवश्यकता यावर प्रकाश टाकण्यात येणार आहे तसेच पशर्वभूमी, महत्त्व, स्वरुप, व्याप्ती, यांची चर्चा करण्यात येणार अहे. त्यांनतर प्रमुख संकल्पना स्पष्ट करुन त्याच्या कार्यात्मक व्याख्यादेखील देण्यात येणार आहेत तसेच संशोधनाची उद्दिष्टचे स्पष्ट करण्यात येणार आहे. तसेच अभ्यासाचा संवादशास्त्रीय दृष्टिकोन स्पष्ट करुन पुढील अभ्यासाची दिशा ठरवणारे आहे. प्रस्तुत प्रकरण अभ्यासविषयाची पार्श्वभूमी स्पष्ट करणारे आहे.

प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती :-

या प्रकरणामध्ये सामाजिक संशोधन, सह्याद्री वाहिनीवरील कृषी संवादाचे पैलू स्पष्ट करावयाचे आहेत. तसेच संशोधनाची गृहितके सांगून वर्णनात्मक संशोधन आराखडा का व कसा वापरला? हे सांगून त्यातील प्रमुख टप्पे स्पष्ट करावयाची आहेत. तसेच तथ्य संकलनाची साधने सांगून, प्राथमिक व दुय्यम साधनांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. सामाजिक सर्वेक्षण व आशय विश्लेषण या दोन प्रमुख पद्धतीवर येथे विशेष प्रकाश टाकण्यात येणार आहे, तसेच संशोधनाच्या मर्यादा सांगून संशोधन प्रणालीचे उपाययोजन करताना वार्तांकन कसे केले आहे हे नमूद करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : सह्याद्री वाहिनीवरील कृषी संवादाचे आशय विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनासाठी निवडलेल्या "सह्याद्री वाहिनीवरील कृषी संवाद : एक विश्लेषणात्मक अभ्यास" या विषयाचे आशयविश्लेषण सादर करावयाचे आहे. या सर्वांचे तौलनिक अध्ययन करताना एका आठवड्याचा अभ्यास, एका महिन्याचा अभ्यास आणि मागील पाच वर्षभरातील प्रसारित कार्यक्रमांचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्रत्येक प्रकारातील एका उत्तम कार्यक्रमाचा नमूना अभ्यासासाठी निवडावयाचा आहे. तसेच शेवटी तालिका व आलेखांच्या आधारे घटक निहाय अनुमान काढण्यात येणार आहे व शेवटी यश आणि अपयशाबद्दल निदान करावयाचे आहे.

प्रकरण चौथे : सामाजिक पाहणीचा अहवाल

प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड शहरातील ३०० शेतकऱ्यांचे कृषीविषयक कार्यक्रमाबाबत सामाजिक सर्वेक्षण करावयाचे आहे. त्यासाठी २५ प्रश्नांची प्रश्नावली तयार करून त्याचा उपयोग करावयाचा आहे. त्या आधारे प्राप्त होणाऱ्या माहितीचे तालिका व आलेखात रूपांतर करून त्यावर भाष्य करावयाचे आहे आणि या अध्ययनाला अंतिम रूप देताना तालिका व आलेख देऊन समाजशास्त्रीय दृष्टिने या पाहणीचे अवलोकन करून परस्पर अनुबंध ठरवून शेवटी अनुमान काढावयाचे आहेत.

प्रकरण पाचवे : सामाजिक परिणामाचे अध्ययन

सह्याद्री वाहिनीवरील कृषी विषयक संवादास किती स्थान दिले जाते वशेतकऱ्यांवर या कृषीविषयक कार्यक्रमाचा परिणाम काय होतो याबाबत शास्त्रीय अध्ययन करण्यात येणार आहे. तसेच हे अध्ययन करताना समाजजीवनातील विविध प्रवाह, समस्या, उपाययोजना यांचीही दखल घ्यावयाची आहे. हे अध्ययन उपरोक्त दोन प्रकरणांचा आढावा घेणारे व मूल्यमापन करणारे आहे.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व उपसंहार

या प्रकरणात प्रथम प्रकरणाचा सारांश देण्यात येईल त्यानंतर ठळक निष्कर्ष मांडून शिफारशी करण्यात येतील. नवी सैद्धांतिक मांडणी करून त्याआधारे अभ्यास विषयाचे नव्याने शास्त्रीय विश्लेषण करण्यात येईल.

संदर्भसूची सोबत जोडण्यात येईल.

संदर्भसूची :-

१. साळुंखे दत्ता हरी, सप्रे दिगंबररावराव, "कृषी विस्तार सेवा", ज्ञान प्रसारण संचालनालय, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, फुले नगर, राहुरी, अहमदनगर.

२. माळी सुनिल, "बातमीदारी", राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१२.

3. Hohenberg John, "The Professional Journalist", Newyork, 1978.

४. धारूरकर वि.ल., "आजकालची पत्रकारिता", रामराज्य प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, १९८४.

५. घाटोळे रा.ना., "समाजशास्त्रीय संशोधन : तत्त्वे व पद्धती", मंगेश प्रकाशन, नागपूर.

६. टिकेकर श्रीपाद रामचंद्र, "बातमीदार", प्रकाशक श्री दत्तात्रय यशवंतराव टिकेकर, सदाशिव पेठ, पुणे, १९३४.

७. आगलावे डॉ.प्रदीप, "संशोधन पद्धती व तंत्रे", विद्या प्रकाशन, नागपूर, २००१.

८. भांडारकर पू.ल., "सामाजिक संशोधन पद्धती", महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर.

९. काचोळे डॉ.दा.धों.,मुधोळकर ज.रा., "सामाजिक संशोधन पद्धती", कैलास प्रकाशन, औरंगाबाद, २००५.

१०. वॉरेन ॲगी, फिलीप ऑल्ट व एडविन इमरी, "इंट्रॉडक्शन टू कम्युनिकेशन"

११. त्रिपाठी नरेंद्र, "डेव्हलपमेंट ऑफ मास कम्युनिकेशन", रेफरन्स प्रेस, नवी दिल्ली, २००५.

12. Gisbert P., "Fundamentals of Sociology", Orient Longmen, New Delhi, 1993.

13. Makodia V.V., "Innovative Technologies of Communication", Paradise Publishers, 2009.

14. Mcquil Denis, "Mass Communication Theory",

15. McQial Denis, "Towards Sociology of Mass Communication", Sage, London.

संशोधक

खंडागळे सचिन नारायणराव

मार्गदर्शक

डॉ.राजेंद्र नारायणराव गोणारकर

सहयोगी प्राध्यापक, माध्यमशास्त्र संकुल,

स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड